# कोविडला शिवीगाळ

कोविड साला हरामखोर
नालायक चेचलाच पाहिजे त्याला, इतका जेवला
पण भूक त्याची शमत नाही!

आई ना बहीण, लहान नाही मोठं नाही
कोविडला कशाचीच चाड नाही, कुचलणे आणि भोसकणे
एव्हढेच त्या मारेकऱ्यास माहित!

लंपट कोविड झोंबतो अन अब्रूच लुटतो
नाती तुटतात, स्नेही दुरावतात, जग वाळीत टाकते
एकटा कोविड उरतो उरावर!

बेशरम कोविड गळा दाबतो एकांतात
मेल्यावरही भेटू की आसू गाळू देत नाही कुणाला
मृत्यू परवडला पण कोविडचा नको!

चोर, अधम खुनी चालतील
त्यांचे पोट भरते, वासना शमते तरी कधीतरी
दुरात्म्या कोविडला ना पोट ना काळीज!

- एक पिसाळलेला कवी

Poet's note: This poem was obviously written in 2020/21 during the pandemic of Covid-19.